# शाहीरी डफ पोवाडा २४ वा.

## पृथ्वीराज चव्हाण यांचा पोवाडा

लेखकः— कविभूषण, महाराष्ट्र शाहीर प्रल्हादराय जामखेडकर, जळगांव, पूर्व खान्देश.

चालः— रजपूतवीर रणधीर, दिल्ली पतिश्वर, खरा नरवीर, पृथ्वीराज चव्हाण गर्जते नांव, शब्दवेदी दुजा भरत खंडात, प्रल्हादराय गातो त्याचा भर माळ ॥ धृ ॥

### चौक १ ला

चालः— आपसांत लागली झुंज, जयचंद त्यांत प्रमुख ॥ साम्राज्य सत्तेचा मद, मिळवीन धुळिस मी खास ॥ द्वेषाचा चढता जोस, गजनीस गेला मग स्वार ॥ शहाबुद्दीन आला धावून, दिल्लीवर गेला चालून ॥ चालः— स्थानेश्वरच्या दक्षिण बाजूला ॥ फौजेचा मेळावा झाला, दलभार प्रकार ते नाना, सामंत आले साह्याला, कोणाचे हातामधे भाला, तिरंदाज त्यांचे जोडीला, बाणाचे भाते पाठीला, पट्याचा सळ हाताला, तलवार होती कमरेला, गाड्यांत गदा

भरलेल्या, गुर्जही त्यांत भरतीला, गजपति त्यांचे संगतिला, रथाची रांग मध्याला, खंदेस्वार होते लढण्याला, पायदळ लुटार पेंढार नाहीं गणतिला ॥ दळबादळ दुसऱ्या बाजूला, घेमार झाली जागेला, डुकर खळी आली जोराला, घोरीही भिडला लढण्याला, पृथ्वीराज त्याच्या सामन्याला, चौखूर हल्ला चढविला, सपसपा उडवी मुंडक्याला, प्रेतांचा ढीग धराणिला, रक्तानें चिखल जाहला, तवा चिंता लागली घोरीला, कसा मिळेल जय आम्हाला, इतक्यांत पृथ्वीराज आला, कैद केलं त्यानं घोरीला, दिल्लीश्वर घेऊनी गेला त्यास दिल्लीला ॥ जी ॥ चाल:— दिल्लीच्या मैदानावर, भरला दरबार, बोल्ला सत्वर, हिंदुचा खराच हिंदुस्थान, परशत्रूचा घेऊनी प्राण, भरत भूमीचा राखूं अभिमान ॥ जी ॥ चाल:— दैदिप्य पाहून दरबार, घोरीस लागला घोर, स्वार्थांध कसा होऊन, आलो मीं येथें धावून ॥ पटापटा पाया पडून, शहाबुद्दीन मागे जीवदान ॥ चाल.— दरबारी लोक खवळला, पृथ्वीराजास बोलूं लागला, सोडूं नका तुम्ही घोरीला, शरण आल्यास मरण देऊं नये धर्म शास्त्राला ॥ कैमास प्रधान बोलला, विनवितो आज तुम्हाला, सोडूं नका तुम्ही सर्पाला, ठेचून टाका जागचे जागेला, असा दाखला दाखवा आम्हाला, सापानें जिवंत सोडलं कधीं कोणाला ॥ जर सोडलंत तुम्ही घोरीला, डाव ठेवून आपले पोटाला, घोरी घेईल तुमचे प्राणाला, पुन्हाः पुन्हा सांगतो तुम्हाला, ठार करा तुम्ही घोरीला, साप दिसला जरी डोळ्याला, तरी सोडाल काय तुम्ही त्याला, म्हणूनच सांगतो तुम्हाला, जागंच जागीं मुंडकं उडवावं याच

 २८२-१

जागेला ॥ जी ॥ चालः— घोरीस दिलं जीवदान, पृथ्वीराजानं, दिलं सोडून, धर्मावर होता पूर्ण विश्वास, दुहीचा लागला गळी गळफास, प्रल्हादराय म्हणे तोडावी ताथ ॥

## चौक २ रा

राठोड कुल भूषण कनोज शहराला ॥ जयचंद गादीवर होता त्याच वेळेला ॥ यज्ञ तो करण्याचा बेत त्यानं ठरविला ॥ मांडलिक करण्याचा घाट त्यानं घातला ॥ करभार घेउन राजे आले सेवेला ॥ पण पृथ्वीराज तो आला नाहीं यज्ञाला ॥ राजकन्या सुंदर योग्य झाली लग्नाला ॥ स्वयंवर नेमिल त्यानं त्याच वेळेला ॥ चालः— संयोगिता स्वरुप सुंदर, देह सुकुमार, किर्ती चौफेर, नेत्र कटाक्ष विषारी बाण, शर सोडिता होती घायाळ, राजे रजवाडे घोटिती लाळ ॥ कामाची केली वाटणी, योग्यतेपणी, करिती धावणी, उणे ना पडूं देती यज्ञांत, पृथ्वीराजाची उणीव ती त्यात, द्वारपालाचे काम ते त्यास ॥ चालः— दिल्लीश्वर तो नाही म्हणूनी पुतळा केला मातिचा, हातामध्यें छडी देऊनी उभा ठेविला द्वाराला ॥ चालः— सूडाची भावना द्वेष मनी भरलेला ॥ द्वेषाचा वृक्ष झरझरा वाढूं लागला काळाची करणी चुकेना कधीं कोणाला ॥ दिल्लीश्वर तो हजर होता यज्ञाला ॥ सैन्यही होतं भरपूर त्याचे दिमिला ॥ चाल— जयचंद बोलला कन्येला, लग्नाचा बेत ठरविला, स्वयंवर आहे उद्याला, बघ दाविन राजे मी तुला, पण एक माझे गोष्टीला, कंठील योग्यवर तुला, घालावी माळ तूं त्याला, असं वाटतं आज आम्हाला, त्याचेहून योग्य वरतां नाहीं दुनियेला ॥ संयोगिता बोलली पित्याला, सर्व ठाऊक आहे ते मला, स्वयंवर हवं कशाला, तुम्हीच करा लग्नाला,

मी वरील योग्य वराला, त्याची काळजी नको तुम्हाला, समजेल सर्व माझ्याला, काज असेल जरी ती त्याला, तो घेऊन जाईल आम्हाला, पण ध्यानात ठेवा गोष्टीला, सिंहाचा छावा कधीं कोल्हा नेईना घराला ॥ मग गेली आपले महालाला, घळघळा पाणी डोळ्याला, अन विचार करूनी मनाला, पत्र दिले पृथ्वीराजाला, माळ घालीन तुमचे पुतळ्याला, सांभाळा उद्या हो तुम्ही तुमचे पत्नीला ॥ चंदाभाट होता सभेला, चंबू वाला म्हणून सेवेला, पृथ्वीराज होता संगतिला, चंदा भाट म्हणे समयाला, राजा शोभा नाहीं यशाला, ताऱ्यांची शोभा चंद्राला, सेनेची शोभा राजाला, निळे आकाश शोभे ताऱ्यांना, कुंकवाची शोभा स्त्रीयांना, तिचगत झाली यावेळा, सार्व भौम म्हणेल कोण तुला, कारण सांगतो आतां सदरेला, पृथ्वीराज नाहीं जरी आला, तरी व्यर्थ खटाटोप झाला, असं वाटतं आज सर्वांना, धिक्कार तुझ्या रे शौर्याला, दिल्लीश्वर धुळीस मिळवितो तुझ्या रे गर्वाला ॥ जयचंद मनी चरकला, आन म्हणाला चंदा भाटाला, जा सांग तुझ्या राजाला, तुझी पर्वा नाहीं रे मला, घटकेत जिंकीन त्याला, काय समजलं कायरे तुला, त्याची किंमत चोपदारापेक्षां नाहीं आम्हाला ॥ असं ऐकून त्याचे शद्बाला, चंबूवाला लालेलाल झाला, कडकडा फाडी ओठाला, जयचंद मनी उमजला, पृथ्वीराज दिसतो हा मला, जर धरलं येथें मी त्याला, पृथ्वीराज नाहीं निघाला, तर हंसतिल लोक हे मला, इतक्यांत प्रकार काय झाला, कांहीं दासी आल्या सेवेला, चंबूवाल्यास पाहून पदर घेती डोईला ॥ जयचंद म्हणे दासींना, कां लाज वाटली तुम्हाला पदर घेतला तुम्ही डोईला, कोण आहे येथें सभेला, ते तरी सांग आम्हाला, दासी म्हणे ऐका शद्बाला, मी मानते पृथ्वीराजाला,

१८२:१



त्याशिवाय मुळींच काजत नाहीं कधीं कोणाला ॥ चंदाभाट उभा सभेला, मान ठेवला त्याचा मी थोडा, म्हणूनच मी पदर घेतला माझ्या डोक्याला ॥ [मिळवणी] पृथ्वीराज खरा नरवीर, दिल्ली पतिश्वर, आहे भूवर, मान तो त्याचा आज जगतांत, लाज वाटते त्याची आम्हास, म्हणून लपवितो तोंड पदरांत ॥ २ ॥

## चौक ३ रा.

चाल:– दुसरे दिवशीं केली तैयारी, लग्नाची सारी, मांडवा भीतरी, देशोदेशिचे निधडे सरदार, मांडलिक तसेंच ते भूपाल, गर्दी कोटली तेथें अनिवार ॥ करावया त्यांचा सत्कार, उभा सत्वर, राजराजेश्वर, जेवणाचा बेत खास करणार, घमघमाट वास येथें येणार, म्हणून तोंडाला पाणी सुटणार ॥ चाल:– [ कटाव ] पाट रांगोळी परोपरीची, वेलबुटी ती नवनवलाची कला दाखविली त्यांत हिसाची, पानें मांडली ती केळींची, सव्वा हात ती लांबी त्याची, डावे हाती पाहिली मिरची, खालीं कोशिंबिर ती केळींची, चटणी तशिच ती डाळींची, गर्दी लिंबूलवण पेरुची, उजवे हाती फळ भाजीची, पातळ भाजी तशी अळूची, भजे, कुर्डया, पापड, कोणची, वडे, सांगडे चटणी आल्याची परोपरीच्या खिरी त्या वरती, मध्यभागी ती मुद, भाताची, चंद्र उगवला का येथेंची, असे वाटते जनमनचित्ती, पिवळे वरण शोभे वरती, तूप वाटिकें नाहीं म्हणूनी, आणा आणा धांवत आधीं, व ढावाढा असे वदति, काडूसी त्या नाहीं गणति, मोतीचूर दळ बेसन म्हणती, बुंदीवर त्या बहुतची प्रीति, जिलबी चिरोटे कांजी फुगली, बासुंदी, पुरी. त्यावर रुसली, श्रीखंडाची पुरी फजिती, वाटा मजला कुणीन वदाती, नाना परीचे भात ही येती, कोणी

पुसेना त्या भाताशी, लाळ आलीका आतां तोंडाशी, पुरी भजी घ्या तुम्ही थोडिशी, वाटी घेऊन बासुंदीची, भरभर मारा फुरके वरती, आग्रह झाला तुम्हास आती, पोट फुगळे वाटे माजती, आळस सोडूनी ऐका पुढती ॥ चाल:– ती दिसे सुबक सुंदरी, रुपगोजिरी, जशी काय हरीण, गजगती चाले टुमकत डोईवर पदर, रुपदिसे तिचे मनोहर, रंभा साचार, आली भूवर, सर्वांस करिल हैराण पाहतां नजर ॥ आली आली स्वरुप सुंदरी, सदा लाजरी, हासरी नजर, घायाळ करून चेतविल हृदयी जाळ ॥ दंत पंक्ती कुदाचिकळी, ओठी पोवळी, नासिका सरळ, मुखचंद्र पाहूनी चंद्र पळाला वर ॥ चाल:- जसा मार लागतो झुरणिला, तसे राजे लागले झुरणिला ॥ एकच ध्यास सर्वांना, संयोगिता हवी आम्हाला ॥ नटून थटून बसले जागेला, न्याहाळून पहाती रुपाला ॥ रुप सुंदर त्यांत आगळा, मानिती तुच्छ मदनाला ॥ हातांत घेऊनि माला, उभी राहिली मध्य भागाला, ॥ चाल:- कार भारी तिच्या जोडीला, सर्वांची माहिती जागेला, प्रधानजी देती वेळेला, ऐकून बेगुमान जाते दुसऱ्या बाजुला ॥ सामंत सारा संपला, सरदार लागला वाटेला, मग आला मुख्य दाराला, कारभारी सांगती मंग तिला, राजे राहिले नाही पृथ्वीला, पृथ्वीराज चव्हाण हा उभा आहे दाराला ॥ तो आला नाहीं सभेला, म्हणूनच पुतळा केला, चोपदाराचे काम ते त्याला, पाहूनी त्याच्या रुपाला, खुदकन हासली बाला, माळ घातली त्याच्या ती गळा, तोच चमत्कार काय झाला, घोडेस्वार हजर दाराला, घोड्यावर बसवुनी तिला, संयोगिता घेऊन जातांना, भयभित झाले सरदार जागचे जागेला ॥ जो तो म्हणतो एकमेकाला, नवल वाटते आज आम्हाला, पृथ्वीराज कोठूनि

आला, आश्चर्य जातां बाजूला, तलवार धरूनी हाताला, रणकंदन झालं ते वेळी, कापिती एकमेकाला, रक्ताचा पाट वाहिला, धुमश्चक्री आली जोराला, रणचंडी नाचे थयथया जागजागेला ॥ चाल:- हंसाचा चारा हंसान, नेला उचलून, मागन कावळयान, कितीही केला तेथें गोंगाट, हातांत काय येणार फुकट थयथयाट, लग्नमंडपी मृत्यूचा थाट ॥ ३ ॥

## चौक ४ था

लग्नांत झाली धामधूम, ठोकून धूम, काढले कापून, सर्वही आले तेथें कामास, एकही सामंत नाहीं राज्यांत, आधारस्तंभ ते गेले खड्डयांत ॥ विषयांत त्याला मध्यें दंग, उडवितो रंग, रंग महालांत, पृथ्वीराज गुंग अंतर महालांत, बद्ध तो झाला मोहपाशांत, रमणी करितसे त्याला दास ॥ चाल:- जया हाती होती तलवार, तया हाती संगीत सूर ॥ शत्रूशीं करी घायाळ, तो नेत्र शरे घायाळ ॥ करपाश घट्ट छातीशी रडविल कोण शत्रूशीं ॥ सुकुमार अडकला पाशीं, ओढील कोणच्यापाशीं ॥ चाल:- अंकीत केला राजाला, त्याच वेळेला ॥ पृथ्वीराज महालांत होता वृद्ध जाहलेला ॥ प्रणयांत रंगूनी गेला अंतर महाल, अंदा धुंद माजली नाली कोण देशाला ॥ चाल:– तंव्हा वाटलं काय परजेला, भेटावं एकदां राजाला, सांगाव कर्म कहाणिला, चंदाभाट हाहोलीराय गेले त्याचे भेटिला ॥ बायकांचा पहारा समयाला, ठायी ठायी तीन जागेला, राजाच्या आलो भेटिला, असा निरोप सांगावा त्याला, भेटीची आस आम्हांला म्हणानिया आले दाराला, निरोप गेला प्रहर घटकेला, संध्याकाळ पावेतो दोघे बसले जागेला ॥ कसा जाब मिळाला त्यांना, तेच सांगतो आंता तुम्हांला, वेताची छडी हाताला, घेऊनि मुली त्या

आरया फडफडा मारित त्याच जागीं दोघाला ॥ कोण दाद देतो निरोपाला, हाहुलीराय क्रोधें भडकला, सुड सुड म्हणून गर्जला, घनघोर करी प्रतिज्ञेला, ढसढसा रडविन संयोगिता जागेता ॥ फोडीन तिच्या बांगडीला, हाहुलीराय म्हणावे तर्ग आम्हाला ॥ चंदाभाट त्यास बोलला, हाय, हाय, तुम्ही कां करतां घोर प्रतिज्ञेला ॥ किती झालं तरी तो राजा आहे आपुला ॥ काय वाटतो सांगतो मी तुला, आपला निरोप नाहीं पोहचला, असं वाटतं मला यावेळा हाहुलीराय बोलला, दे सोडून पुळचट गप्पांना, मी जातो आतां गझनिला, आन घेऊन येतो घोरीला, पारिपत्य त्याच करण्याला, चंदा भाट देतो जाबाला, हे योग्य नाही रे तुला, हा देश आहे आपुला, मूल हगलं मांडीवर कापतो कोण मांडिला ॥ हे ठाव आहे ना तुला, आपसांत तंटा जर झाला, बोलवावे काय परक्याला, तें सांग आधी आम्हाला, जरी भांडलो आम्ही वेळेला, तरी एक होऊनी ठार करू शत्रूला ॥ ही नीति शिकवी धर्मराज आपणा ॥ ध्यानांत घेऊन गोष्टीला, सोडाव तुम्ही नादाला, काळाची लिला आगाध चुकेना कोणला ॥ हाहुलीराय गेला गझनिला, सारा प्रकार सांगतो घोरीला, बायकोच्या लागुन नादाला, व्यसनांत गुंग जाहला, मानी ना कोणी कोणाला, गड्ड्या गोंधळ सारा माजला, छडी खालीं मारलं आम्हाला, त्याचा सूड पाहिजे घेण्याला, म्हणूनच सांगतो तुम्हाला, अगणित घेऊन फौजेला, चला चला तुम्ही दिल्लीला वेळ काय दिल्ली जिंकण्याला, मोठे मोठे वीर रणवीर गेले स्वर्गाला ॥ कमजोर झाला चव्हाण चला दिल्लीला ॥ हाहुलीराय सपोनें डंक, पहा घेतला ॥ दिल्लीश्वर व्हावया मदत करतो घोरीला, ॥ शहाबुद्दीन वेग चालला, सूड होता

२८५-२

त्याचे पोटाला, महात होता योग्य वेळला, दिल्ली घेऊन आपले हाताला, हाल हाल करून ठार करीन पृथ्वीराजाला ॥ शहाबुद्दीन आला सामन्याला, हे कळणार कसं राजाला, हाहुलीराय ही होता त्याचे दिमतिला ॥ [ मिळवणी ] समरसिंह धांवला मदतीला, दिल्ली शहराला, आला वेळेला, राजाला बातमी कशी कळणार, युक्ती योजिली त्याने मजेदार, पुढील चौकांत तुम्हा कळणार ॥ ४ ॥

## चौक ५ वा

चाल.- पृथ्वीराज होता निद्रिस्त, रंग महालांत, पूर्ण मौजेत, जागयाला जागं कोण करणार, कडक बंदोबस्त शीस्त जोरदार, मुंगीला वाट कशी मिळणार ॥ समरसिंह करी मसलत, पहा हातो हात, तेथें झटक्यांत, कबूतर होतं त्याचे ताब्यांत, चिठ्ठी बांधुनी त्याचे गळ्यात, उडाला पक्षी गेला महालांत ॥ चाल:- पाहून वेळी पक्षाला, सोडून घेतलं त्यानं पत्राला, धडधडा वाचून चिठ्ठीला, खाडकन शुद्धीवर आला, सारा प्रकार येता ध्यानाला, अन् म्हणे संयोगीतेला, नाश केलास राज्याचा सारा, मी जातो आतां युद्धाला, काय आहे तुझ्या नशिबाला, ते ठाव नाहीं ग मला, घोरी आला दिल्ली घेण्याला, हाहुलीराय मदतीला, घाईघाई गेला कचेरीला, समरसिंह त्यास भेटला, मनसुबा केला सदरेला, सामंत राहिला नाहीं मदतिला, लग्नांत ठार तो झाला, राठोड आहेत जागेला, पण फितुर झाले घोरीला, मग कोण करतो साह्याला, जे होते तवां जागेला, त्यांच्यासह चालला सिंह झुंज घेण्याला ॥ चाल:- कुरु क्षेत्री युद्ध घन घोर, झालं आपार, राहिलेले वीर, पटापट मरती

तेव्हां जागेस ॥ चामुंडराय तंवा बोलला, बाण हाताला, एक राहिला, कोणावर सोडू बोला झटकन ॥ चाल:- पृथ्वीराज बोलू लागला, चामुंडराय ऐका गोष्टीला, शहाबुद्दीन आला सामन्याला, हा हुलीराय जोडीला, पण गोष्ट ठेवा ध्यानाला, जो फितुर होतो दुसऱ्याला, त्याला ठार करा जागेला, सण्णण् करून वेगाने बाण चालला ॥ लागला हाहुलीरायला, देहांतून निघोनी गेला, आन् धाडकन पडला धरणिला, हाहुलीराय ठार झाला जागचे जागेला ॥ घोरी धांवला त्याचे मदतिला, शहाबुद्दीन सोडी बाणाला, त्या सरसा चामुंडराय आला तेथें कामाला ॥ पृथ्वीराज होता जाग्याला, क्रोधाने लाल भडक झाला, धनुष्य होते हाताला, त्यावरी बाण चढविला, दिला ताण तंवां दोरीला, कडकडाट आवाज होऊन बाण गळाला ॥ चाल:-धनुष्याची दोरी तुटली दोष दैवाला ॥ दिल्लीची दौलत चालली पहा खड्याला ॥ काळाची करणी ही दोष द्यावा कोणाला ॥ पृथ्वीराज चव्हाण एकटा होता लढण्याला ॥ कोणाच नाहीं त्यावेळीं त्याच्या मदतिला ॥ चाल.- तोच काय झाल जागेला, मत्रींनी घेरल राजाला, करकचून आवळल त्याला, फरफरा ओढीत घेऊन चालले राजाला ॥ जाऊन पोहोंचले तंवां गझनीली, भुयारांत ठेवल मग त्याला, हव्वा मण बेडी पायाला, डोळे फोडले दोन्हीच्या दोन्ही मानेवर गोळा ॥ चाल:- चंदाभाट गेला दरबारी, ऐकावे शब्द तुम्ही घोरी । जयजय कार तुमचा ललकारी, जनतेत तुम्हीच वीर भारी ॥ चाल: पृथ्वीराज शद्ब वेदी तो दुनिये भीतरी ॥

त्याच्याहून आणिक तो नाहीं कुणी भूवरी ॥ कृष्णसखापार्थ तो झाला एक द्वापारी ॥ कलीयुगी पृथ्वीराज आहे एक खरोखरी ही मौज पहावी तुम्ही आतां सत्वरा ॥ परवानगी द्यावी आम्हास भेटण्यातरी ॥ घोरी म्हणे पुरवीन हेस तुमचा झडकरी ॥ चालः- चंदामाट गेला भुयाराला, कडकडून भेटला राजाला, डोळे नव्हते जरी पहाण्याला, ओळखलं त्यान चंदाला, गहिंवर आलं दोघाला, पृथ्वीराज म्हणे त्याजला, मित्रा आला काय भेटिला, ठार मार येथें याच जागेला, मीच कारण झालो त्यावेळां, पाहुनको अंत समयाला; घे तलवार आणि काप गळा माझाचरचरा ॥ राजा ऐक माझ्या वचनाला, मोल आहे तुझ्यारे जिवाला, शब्द वेदाची कलाही आहे तुझ्या हाताला, ती दाव आतां शहाला, शब्दवेद तुझा बघण्याला, घोरीला तैयार मी केला, धिक्कार तुझ्यारे शब्दाला, ज्यानं ठेवलं मला कैदेला, त्यालाच दाखव् काय कला, कानांत चंदा बोलला, हर्षान राजा म्हणाला, बरंबरं आतां ते आलं माझे ध्यानाला ॥ चालः-शब्दवेद त्याचा बघण्याला, दरबार भरविला, दुसरे दिवसाला, तवे टांगुन ठेवले मध्यास, गर्दी लोटली तेथें आफाट, शब्दवेद तो बघण्यास ॥ चालः- अन् आणलं पृथ्वीराजाला, बेडी होती हाता पायाला, खुल केलं त्यान राजाला, धनुष्य दिलं हाताला, असा करार होता ठरलेला कोणताही तवा वाजवावा, तो शब्द त्यांनीं ऐकावा, मले शाबास शहानी म्हणावा, त्या सरसा तवा बाणांनीं

खाली पाडावा ॥ शहाबुद्दीन आला वेळेला, तख्या समोर बसला गादीला, पृथ्वीराज उभा सामन्याला, बाण लावला त्यान दोरीला, धनुष्याची खांडोळी झाली जागचे जागेला ॥ दिल धनुष्य आणून पुन्हा त्याच त्याजला, पुन्हा बाण लावला दोरीला, दोरी खेचली त्याच वेळेला, सज्ज झाला बाण सोडण्याला, इतक्यांत खणकन् आवाज आला कानाला ॥ भले शाबास घोरी बोलला, चंदाभाट म्हणे राजाला, काय बघतोस काय आतां राजा, शेवटची संधी ही तुला, तुझी कला दाव या वेळा, सातवींत दीड बोटाला, तवा आहे बघ टांगलेला, काय ऐकतोस सोड बाणाला, बाण सुटला त्याच वेळेला. घोरीच्या छातीतून पार निघोनी गेला ॥ शहाबुद्दीन जागचे जागी ठार झाला वेळेला ॥ चंदाभाट बोलला राजाला, भले शाबास चिंता नाही मला, शहा मेला जागचे जागेला, आपला कार्यभाग पुरा झाला, आता मरूं याच जागेला, मारिती एकमेकाला, पृथ्वीराज आणि चंदाभाट पडले धरणीला ॥ शहरो शहरीं प्रल्हाद रायाच्या रंग-कवनाला ॥ पोवाडा संपला कीड लागली देशाला ॥

---

सर्व प्रकारचे पोवाडे विकत मिळण्याचे ठिकाणः-

**जामखेडकर आणि सन्स**

**जळगांव पू. खा.**

समता प्रेस जळगांव.